प्रेसनोट

जा.क्र. ३४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०७/२०१८

भंडारा जिल्हा पोलीसांची रेड स्कॉड कार्यवाही

भंडारा: – दिनांक ०३/०७/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रेड पथक पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा पोउपनि. आडोळे, सफौ. मेहर बं. नं. ५३९, पोहवा. जांगळे बं. नं. १६३, पोना. डाहारे ब. नं. ४३, पो. शि. शिवनकर १०९१, यांनी पोलीस स्टेशन पवनी अंर्तगत येत असलेल्या मौजा. मेंडेगाव शिवार ता. पवनी जि. भंडारा ते शंकरपुर जिल्हा चंद्रपुर कडे जाणारी एक पांढऱ्या रंगाची ताडपत्री झाकलेली क्रमांक एम.एच ४९ डी ६८३१ या प्रमाणे आली असता सदर वाहनास थांबवुन वाहणाची पाहणी केली सदर वाहनाचे डाल्यात कागदी खरडयाचे देशी दारुने प्लास्टीक बाटलीत भरलेल्या २२० पेटया मिळुन आल्या, ज्यामध्ये बॅच क्र. ०३७ जुन २०१८ च्या १०० पेटया व बॅच क्र. ०३९ जुन २०१८ च्या १२० पेटया प्रत्येक पेटीमध्ये १० एम. एल. देशी दारुने भरलेली १०० प्लॉस्टीक बॉटल प्रत्येकी बॉटल किंमती २६ रुपये प्रमाणे असा एकुण ५,७२,०००/–रुपयाचा माल मिळुन आला. त्याबाबत पास पररवाना विचारले असता कोणत्याही प्रकारचा पास परवाना सोबत न बाळगता मिळालेला मालाला सि. ए. सॅम्पल करीता एका पेटीतील ९० एम. एल. देशी दारुने भरलेली प्लॉस्टीक बॉटल सिलबदं करण्यात आले. तसेच एक पांढऱ्या रंगाची टाटा टर्बो मालवाहक गाडी क्र. एम. एच. ४९ डी ६८३१ अंदाजे किंमती ६,००,०००/–रुपयाचा असा एकुण ११,७२,०००/–रुपयाचा माल मिळुन आल्याने वेगळया जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आला व जप्ती माल व आरोपी ताब्यात घेण्यात आले.

सदर दोन्ही आरोपीतांना मुद्देमाला बाबत विचारपुस करुन बयाण नोंदविले. त्याचप्रमाणे सदर अवैध देशी दारुच्या पेटया शिवा अन्ना रा. नागपुर यांचे सांगणे वरुन कारगाव शिवारात एका पांढऱ्या रंगाचे गाडीतुन दोन ईसमांनी २२० पेटया देशी दारु आरोपीचे गाडीत भरले सद रगाडी शिवा अन्नाने भुयार, मेंडेगाव, कांम्पा मार्गे राजुली, मुल जिल्हा चंद्रपुर येथे नेण्यास सांगीतल्याचे आरोपीतांनी सांगीतले.

यातील नमुद आरोपी व ईतर अज्ञात आरोपीतांनी मिळुन संगनमत करुन कट रचुन देशीशासकीय परवाण्याचे उल्लघंन करुन अवैधरित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५(ई),७७(अ),८२(१)८३(ब)अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

४/७/१८

(पोनी. एम. एम. सिडाम)
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.